ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करा

परंपरा आणि नवतेचा संगम

# नव शक्ति

महाराष्ट्र

२४४ ● रविवार ● २० जुलै २०२५ ● पाने ● ११ ● किंमत ₹ ५ ● पुणे किंमत ₹ ६ फक्त ● marathi.freepressjournal.in Reg.No.MCS/049/2021-23/RNI No.1891/57 m.p

## क्विक हील सायबर सुरक्षा क्लबची स्थापना

**डोंबिवली** : ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रगती महाविद्यालयात सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात नवे पाऊल टाकत 'क्विक हील सायबर सुरक्षा क्लब'ची स्थापना करण्यात आली. या क्लबची स्थापना विद्यार्थ्यांनी क्विक हील फाऊंडेशनतर्फे पुण्यात आयोजित विशेष सायबर प्रशिक्षण सत्रासाठी निवड झाल्यानंतर, त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीच्या निमित्ताने झाली. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ. धनंजय वानखेडे, उपप्राचार्या डॉ. कीर्ती बराड व शिक्षक समन्वयक रुपाली पाटील यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या यशस्वी सहभागाचे व त्यांच्यातील कौशल्याचे कौतुक करत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय प्रशासनाने दिलेल्या पाठिंब्याची दखलही यावेळी घेण्यात आली. कार्यक्रमात माजी क्लब अध्यक्ष देवेन पाटील आणि माजी सचिव गौरव कुमार यांचा दोन वर्षांच्या कार्यकाळातील उत्कृष्ट